# 'यशोदा'च्या प्राध्यापकांना फार्मसीमधील संशोधन कार्यासाठी पेटंट प्राप्त

**तामजाईनगर (सातारा) :** यशोदा टेक्निकल कॅम्पसच्या कॉलेज ऑफ डिप्लोमा फार्मसीमधील प्राध्यापकांना त्यांच्या नवकल्पना आणि संशोधन कार्यासाठी भारत सरकारकडून पेटंट जाहीर करण्यात आले. यशोदा टेक्निकल कॅम्पसमधील रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट सेल आणि इंक्यूबेशन सेल यांच्या माध्यमातून शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या शोध गरजांची पूर्तता करता येईल, अशा प्रकारच्या संसाधनांची मुबलक उपलब्धता करण्यात आली आहे.

डिप्लोमा फार्मसीमध्ये या शिक्षकांना पोर्टेबल डिवाइस फोर मेजरमेंट ऑफ कार्डियाक अरेथामिया या संशोधनकार्यासाठी नुकतेच भारत सरकारकडून पेटंट प्राप्त झाले आहे. प्राध्यापकांमध्ये आशिष थोरात, स्वप्नाली पाटील, नाझिया बागवान, आशिष भोंगाळे, पूजा कदम आणि अमृता सोनमले यांचा समावेश आहे.




विद्यार्थ्यांच्या मनात असणाऱ्या नवकल्पनांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्यातील संशोधक जागा करून उत्क्रांती घडवून आणण्यासाठी त्या प्रकारचे शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे ही शैक्षणिक संस्थांची महत्त्वाची जबाबदारी आहे. यशोदा टेक्निकल कॅम्पसमध्ये संशोधनाच्या आवश्यक दृष्टीने आवश्यक असणारे उच्चतम शैक्षणिक वातावरण तज्ज्ञ प्राध्यापकांच्या माध्यमातून निर्माण झाले आहे. येथील प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे शोधनिबंध बनवण्यावर, पेटंट प्राप्त करण्यावर, चर्चासत्रामध्ये सहभाग घेण्यावर विशेष भर देतात.

शिक्षकांच्या शोधकार्यातील या कामगिरीबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. दशरथ सगरे, उपाध्यक्ष प्रा, अजिंक्य सगरे, कार्यकारी संचालिका नम्रता सगरे यांच्यासह संचालक, प्राचार्य, सहसंचालक, कुलसचिव आदींनी त्यांचे विशेष कौतुक केले आणि भावी वाटचालीसाठी आणि संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

Smart Solapur Edition
Jan 9, 2024Page No. 05
Powered by : eReleGo.com